# शाश्वत विकासात ई-कचरा व्यवस्थापन महत्त्वाचे

## कुलगुरू डॉ. कामत; शिवाजी विद्यापीठात 'मिशन लाईफ कॅम्पेन'ला प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक शाश्वत विकासाच्या प्रक्रियेमध्ये सुसंगत ई-कचरा व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन लाईफ कॅम्पेन'च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'मिशन लाईफ कॅम्पेन' अंतर्गत ई-कचरा संकलनाला प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. रजनीश कामत. सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवर.**

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाईल आदी वाढत्या सुखसोयीच्या साधनांमुळे ई-कचऱ्याचे प्रमाणही जागतिक स्तरावर वाढत आहे. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे आहे. त्यासाठी योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने जनमानसात ई-कचरा व्यवस्थापनविषयक प्रचार व प्रसार व्हावा, त्याचे महत्त्व समजावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने हे अभियान हाती घेतले आहे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, ई-कचऱ्याचे वाढते प्रमाण मानवासह पर्यावरणासाठीही घातक आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये अनेक दुर्मीळ मूलद्रव्ये वापरली जातात. त्यांची योग्यप्रकारे विल्हेवाट न लावल्यास ही मूलद्रव्ये अस्तंगत होतील. त्यामुळे ई-कचरा व्यवस्थापनाच्या माध्यमातून या मूलद्रव्यांचा पुनर्वापर कसा होईल, या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

दरम्यान, पर्यावरण संवर्धन आणि ई-कचरा या विषयावरील ऑनलाईन पोस्टर प्रदर्शनाचे कुलगुरूंच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत, अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. पवन गायकवाड, आनंद खामकर, आशीष घाटे, दिनेश उथळे, शरद पाटील, डॉ. कविता वड्राळे, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, उदय पोवार, माऊली पांढरे, संतोष वंगार, विनोद लोखंडे आदी उपस्थित होते.

2 7 MAY 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अँकर | विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजन

# शिवाजी विद्यापीठात मिशन लाईफ कॅम्पेनला प्रारंभ

| प्रतिनिधी, कोल्हापूर

जागतिक शाश्वत विकासाच्या प्रक्रियेमध्ये सुसंगत ई–कचरा व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन लाईफ कॅम्पेन'च्या उद्‌घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाईल आदी वाढत्या सुखसोयींच्या साधनांमुळे ई–कचऱ्याचे प्रमाणही जागतिक स्तरावर वाढत आहे. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. त्यासाठी योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने जनमानसात ई–कचरा व्यवस्थापनविषयक प्रचार व प्रसार व्हावा, त्याचे महत्त्व समजावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने हे अभियान हाती घेतले आहे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, ई–कचऱ्याचे वाढते प्रमाण मानवासह पर्यावरणासाठीही घातक आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूमध्ये अनेक दुर्मिळ मूलद्रव्ये वापरली जातात. त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावल्यास ही मूलद्रव्ये अस्तंगत होतील. त्यामुळे ई–कचरा व्यवस्थापनाच्या माध्यमातून या मूलद्रव्यांचा पुनर्वापर कसा होईल, या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.



कोल्हापूर : 'मिशन लाईफ कॅम्पेन'अंतर्गत ई–कचरा संकलनाला सोमवारी प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. कविता वड्राळे, डॉ. कबीर खराडे, डॉ. मुरली भानारकर, डॉ. पवन गायकवाड, आनंद खामकर, अविनाश भाले आदी.

कुलगुरू डॉ. कामत आणि कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते ई–कचऱ्याचे संकलन टाकीमध्ये संकलित करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि ई–कचरा यावरील ऑनलाईन पोस्टर प्रदर्शनाचेही कुलगुरूंच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. पवन गायकवाड, आनंद खामकर, आशिष घाटे, दिनेश उथळे, शरद पाटील, डॉ. कविता वड्राळे, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, उदय पोवार, माऊली पांढरे, संतोष वंगार, विनोद लोखंडे उपस्थित होते.

27 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासात ई-कचरा व्यवस्थापन महत्त्वाचे

## कुलगुरु डॉ. राजनीश कामत : शिवाजी विद्यापीठात मिशन लाईफ कॅम्पेनला प्रारंभ

**जनप्रवास : कोल्हापूर**

जागतिक शाश्वत विकासाच्या प्रक्रियेमध्ये सुसंगत ई-कचरा व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन लाईफ कॅम्पेन'च्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरु डॉ. कामत म्हणाले, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाईल आदी वाढत्या सुखसोयीच्या साधनांमुळे ई-कचऱ्याचे प्रमाणही जागतिक स्तरावर वाढत आहे. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. त्यासाठी योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जनमानसात ई-कचरा व्यवस्थापन विषयक प्रचार व प्रसार व्हावा, त्याचे महत्त्व समजावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने हे अभियान हाती घेतले आहे. यामध्ये ई-कचऱ्याच्या संकलनासह त्याची योग्य विल्हेवाट लावण्याचा समावेश आहे. लोकांनीही आवश्यकता असल्याविना इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाईल आदी वस्तूंची खरेदी करणे टाळावे, त्याचप्रमाणे नादुरुस्त किंवा खराब झालेल्या वस्तूंची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी विचार मांडले. यावेळी कुलगुरू डॉ. कामत आणि कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते ई-कचऱ्याचे संकलन टाकीमध्ये संकलित करण्यात आला. तसेच, या निमित्ताने आयोजित पर्यावरण संवर्धन आणि ई-कचरा या विषयावरील ऑनलाईन पोस्टर प्रदर्शनाचेही कुलगुरूंच्या हस्ते उद्‌घाटन केले.



**शिवाजी विद्यापीठात 'मिशन लाईफ कॅम्पेन'अंतर्गत ई-कचरा संकलनाचा प्रारंभ करताना डॉ. राजनीश कामत. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. कविता वड्राळे, डॉ. कबीर खराडे, डॉ. मुरली भानारकर, पवन गायकवाड आदी.**

सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. पवन गायकवाड, आनंद खामकर, आशिष घाटे, दिनेश उथळे, शरद पाटील, डॉ. कविता वड्राळे, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, उदय पोवार, माऊली पांढरे, संतोष वंगार, विनोद लोखंडे आदी उपस्थित होते.

2 7 MAY 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी कुलगुरू डॉ. कामत यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित मान्यवर.

# विद्यापीठ, उद्योगांनी एकत्रित काम करणे गरजेचे

- कुलगुरू डॉ.आर.के. कामत यांचे प्रतिपादन
- कोल्हापूर इंजिनियरिंगतर्फे कुलगुरूंचा सत्कार

प्रतिनिधी, कोल्हापूर

शेजारील बेळगाव हे शहर औद्योगिकदृष्ट्या वेगाने प्रगती करत आहे. यासाठी कोल्हापुरातील उद्योग आणि शिवाजी विद्यापीठ यांनी एकत्रित काम करणे काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योग व विद्यापीठ यांनी हातात हात घालून काम केल्यास विद्यार्थ्यांसह उद्योग क्षेत्रालाही मोठा फायदा होईल असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या १४ व्या कुलगुरूपदी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची निवड झाली. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी उद्योग व विद्यापीठ यांच्या समन्वयातून विविध विकासात्मक उपक्रम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

सायबर सिक्युरिटी, इंटर्नशिप/अप्रेंटिसशिप, स्पोर्ट्स मॅनेजमेंट आणि उद्योगाभिमुख अभ्यासक्रमांवर विशेष भर देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष कमलाकांत कुलकर्णी यांनी कोल्हापूरमधील फौंड्री उद्योग लक्षात घेता शिवाजी विद्यापीठात फौंड्री मटेरियल टेस्टिंग सुविधा सुरू करण्याची मागणी केली. उपाध्यक्ष श्रीकांत दुधाणे यांनी इंडस्ट्रियल वेस्टवर संशोधन करून हा प्रश्न मार्गी लावण्याची गरज व्यक्त केली.उद्योजकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रा. डॉ.ज्योती जाधव यांनी सांगून,उद्योग व विद्यापीठ यांनी संवाद होण्यासाठी ग्रुप स्थापन करण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. डेळेकर यांनी दर तीन महिन्यांनी बैठक घेण्याची सूचना केली.

यावेळी कोल्हापूर फर्स्टचे चेअरमन सुरेंद्र जैन, प्रा. सुभाष माने, हरिश्चंद्र धोत्रे, नेंमिचंद संघवी, सीए सचिन बीडकर, बळीराम वराडे, प्रदीप व्हरांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2026
तरुण भारत



कोल्हापूर : नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला कुलगुरू डॉ. कामत यांची भेट

त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस मंगळवारी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्यांचा संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या भेटीमध्ये त्यांनी प्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. याप्रसंगी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १४ कुलगुरुंपैकी ५ कुलगुरु हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरु पदापर्यंतचा आपला प्रवास झाला आहे. या संस्थेचा विद्यार्थी आहे, याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य एस. एम. गवळी, आजीव सेवक डॉ. आर. व्ही. शेजवळ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.

2 7 MAY 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्याचे काम डॉ. यादव यांनी केले

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

गुणवत्तेसाठी सतत आग्रही असणारे आणि शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे शिवाजी विद्यापीठाचे प्रथम प्र–कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांच्या निधनामुळे बहुआयामी व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेले, अशा शब्दात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम प्र–कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित केलेल्या शोकसभेत कुलगुरू डॉ. कामत बोलत होते.

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतलेले डॉ. के. आर. यादव कडक शिस्तीचे, उत्कृष्ट अध्यापक, शिस्तप्रिय आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. राजर्षी छत्रपती शाहूरायांच्या विचारांचा वारसा जपत शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. नॅशनल सायन्स काँग्रेसशी निगडीत असताना त्यांनी अतिशय चांगले कामे केले. शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. आंबेडकर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर त्यांनी सदस्य आणि अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर यांनी लावलेली शिस्त पुढे घेवून गेले. असेही कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

प्राचार्य असताना डॉ. के. आर. यादव यांनी लावलेल्या कडक शिस्तीमुळे न्यू कॉलेजचे नाव पश्चिम महाराष्ट्रामध्ये आदराने घेतले जात

**■ कुलगुरू डॉ. कामत यांचे प्रतिपादन**

होते. त्यांच्या शिस्तीतच आपण घडल्याचे प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सांगितले.

याप्रसंगी समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रल्हाद माने, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे शरद तळेकर, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे नंदकुमार झांजगे यांचीही भाषणे झाली. यावेळी शिक्षक, अधिकारी, सेवक, विद्याथी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2026

जनप्रवास

# बहुआयामी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड: कुलगुरू

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम प्र-कुलगुरू डॉ.के.आर.यादव यांच्या निधनामुळे बहुआयामी व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहेत, अशा शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये प्रथम प्र-कुलगुरू डॉ.के.आर.यादव यांच्या दुःखद निधनामुळे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, डॉ.के.आर.यादव यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. कडक शिस्तीचे, उत्कृष्ट अध्यापक, शिस्तप्रिय आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून डॉ.यादव यांचे नांवलौकिक होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव शोकभावना व्यक्त केल्या. याप्रसंगी समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ.प्रल्हाद माने, शरद तळेकर, शिनंदकुमार झांजगे यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2026
सकाळ

# डॉ. आंबेडकर संशोधन केंद्राच्या संचालकपदी पी. के. गायकवाड



गायकवाड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या संचालकपदी प्रा. डॉ. पी. के. गायकवाड यांची प्रशासनाने नियुक्ती केली. कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी नियुक्तीबाबतचा आदेश काढला असून, डॉ. गायकवाड यांची नियुक्ती आजपासून पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहे. विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्रमुखपदी डॉ. गायकवाड कार्यरत आहेत. विद्यापीठ प्रशासनाने जारी केलेल्या कार्यालयीन आदेशानुसार त्यांच्याकडे केंद्राच्या संचालकपदाची जबाबदारी सोपविली आहे. दरम्यान, गेल्या महिन्यात विद्यापीठाने या केंद्राच्या संचालकपदी डॉ. एन. बी. गायकवाड यांची नियुक्ती केली होती. त्यावर विद्यापीठात काही संघटनांनी आक्षेप नोंदवत फेरविचार करण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रशासनाने आज डॉ. गायकवाड यांची संचालकपदी नियुक्ती केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2026
जनप्रवास

# विद्यापीठाच्या १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

## ५६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या वर्णनात्मक पध्दतीने

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. सोमवारी बीए, एमसीए, एमजे, एमबीए अशा विविध ५६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ८४ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ७०१७ विद्यार्थी उपस्थित होते.

सोमवारी विविध १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ४३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. २५ मे रोजी सदर पथकाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची



नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

2 7 MAY 2026

महा न्यूज & व्ह्यूज




# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून जागतिक पर्यावरण अभियान

**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने 'जागतिक पर्यावरण दिन पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ अभियान' अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हे अभियान दिनांक २५ मे ते ५ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. ही माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली आहे.

यावर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना ''हवामान बदल'' ही असून पृथ्वीसमोरील वाढत्या पर्यावरणीय आव्हानांबाबत जनजागृती निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. अभियानांतर्गत ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, प्लास्टिकमुक्त जीवनशैली, ई-कचरा व्यवस्थापन, कचरा निर्मूलन, शाश्वत अन्नप्रणाली आणि आरोग्यदायी जीवनशैली या सात प्रमुख विषयांवर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या अभियानाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते दिनांक २५ मे रोजी होणार असून याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत. या अभियानाचा भाग म्हणून विद्यापीठ परिसरात ई-कचरा संकलन मोहीम आयोजित करण्यात येणार असून मोबाईल, चार्जर, बॅटऱ्या, जुने संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, केबल्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक साहित्याचे सुरक्षित संकलन करण्यात येणार आहे.

दि. २६ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत जनजागृतीपर पोस्टर्स, डिजिटल स्क्रीनसेव्हर्स आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला जाणार आहे. दि. २७ मे श रोजी ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या विषयावर ऑनलाइन प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले असून ग्रीस येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, डॉ. रानिया लंपाऊ या मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर २९ मे रोजी ई-कचरा व्यवस्थापन व शाश्वत विकास विषयावर सिद्धार्थ शिंदे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच ३० मे रोजी ''समाज आणि शाश्वत विकास : शिक्षकांची भूमिका''या विषयावर डॉ. सुधीर कुंभार यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

या अभियानांतर्गत विद्यापीठ परिसर व संलग्न महाविद्यालयांमध्ये ई-कचरा सर्वेक्षण आणि लेखापरीक्षण देखील राबविण्यात येणार आहे. गूगल फॉर्मच्या माध्यमातून हे सर्वेक्षण २५ मे ते १ जून या कालावधीत करण्यात येणार आहे. या अभियानाचा समारोप कार्यक्रम ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनी होणार आहे.

2 7 MAY 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

# ज्ञानासाठी काय पण!

डॉ. व्ही.एन. शिंदे

**कोरोनाची साथ जगभर पसरली आणि फॅरनहाईट शब्द घरोघरी पोहोचला, त्यामुळे मानवी शरीराचे तापमान ९८.६ फॅरनहाईट इतके असते हे ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचले. हे तापमानाचे एकक ज्यांच्या नावावरून आले ते डॅनिएल गॅब्रिएल फॅरनहाईट. फॅरनहाईट तापमापी आणि तापमापन पद्धती त्यांनी शोधली. मात्र, त्यांचा या ऐतहासिक कामगिरीपर्यंतचा प्रवास असाच झाला नाही. विज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी आणि संशोधनासाठी त्यांना चक्क भूमिगत व्हावे लागले होते.**

खरे तर, डॅनिएल यांचा जन्म २४ मे १६८६ रोजी पोलंडमधील अत्यंत सुखवस्तू कुटुंबात झाला. वडील व्यावसायिक होते. त्यांना राज्यात मोठा मान होता. उच्च पदस्थांमध्ये त्यांची उठबस होती. त्यांच्या मुलींचे विवाह सत्ताधीशांच्या घरात झाले होते. मात्र, डॅनिएल १५ वर्षांचे असताना, विषारी मशरूम खाल्ल्याने आई आणि वडील दोघांचाही मृत्यू एकाच वेळी झाला. डॅनिएल जगलेल्या दहा मुलांतील सर्वात मोठे. मात्र, त्यावेळच्या नियमाप्रमाणे त्यांना वडिलांचा व्यवसाय वयाची २४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर सांभाळता येणार होता, तोपर्यंत त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना पालक बनवण्यात आले. लहान भावंडांना बालकाश्रमात ठेवण्यात आले आणि फॅरनहाईटना वडिलांचा व्यवसाय सांभाळण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी नेदरलँडला पाठवण्यात आले. तेथील प्रसिद्ध व्यापारी व्हॅन बेनिंगन यांच्याकडे त्यांचे व्यवसाय प्रशिक्षण सुरू झाले. हे प्रशिक्षण पूर्ण होत आले असताना, प्रशिक्षणाचाच भाग म्हणून त्यांना बर्लिन, ड्रैस्डे, लिपढीग, हॅले, कोपनहेगन इत्यादी शहरांना भेटी देण्यासाठी पाठवण्यात आले. त्यावेळी त्यांच्या पाहण्यात फ्लोरेंटाईन तापमापी आला.

हा तापमापी इटालीमध्ये सुमारे साठ वर्षांपूर्वी बनवण्यात आला होता. ते मोठ्या प्रमाणात तयार करून विकत असत. या तापमापींना पाहिल्यानंतर डॅनिएल यांचे कुतूहल जागे झाले. त्यांनी कोणत्याही पारंपरिक शाळा किंवा महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले नव्हते. मात्र, त्यांनी विज्ञान विषयावरील साहित्य वाचण्यास सुरुवात केली. ख्रिस्तियन वोल्फ आणि गॉटफिल्ड लेब्निझ अशा त्या काळातील संशोधनातील सर्वोच्च स्थानांवर असलेल्या संशोधकांशी संपर्क साधला. त्यांनी प्रशिक्षण सुरू असतानाच वैज्ञानिक प्रयोगही करण्यास सुरुवात केली. त्यांच्याकडे त्यासाठी पैसे नव्हते. त्यांनी या प्रयोगासाठी सहाध्यायीकडून पैसे उसने घेतले. प्रयोग यशस्वी झाले नाहीत, डॅनिएल पैसेही परत करू शकले नाहीत. मात्र, त्यातून विज्ञानातील ज्ञानाची ओढ वाढतच गेली. हे पैसे त्यांचे पालक म्हणून नियुक्त पालकांना द्यावे लागले. जवळजवळ पूर्ण होत आलेले व्यावसायिक प्रशिक्षण सोडण्याचा आणि विज्ञान संशोधन करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. आजच्या काळात असा निर्णय घेणे हे फार अवघड नाही. मात्र, त्याकाळी हा राजद्रोह ठरत असे. ज्यावेळी डॅनिएल यांनी प्रशिक्षण घेणे बंद केल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले, तेव्हा वीस वर्षीय फॅरनहाईट यांना अटक झाली. त्यांना पुन्हा ईस्ट इंडिया कंपनीमध्ये प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले. मात्र, त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना चकवा दिला आणि फरारी झाले. डेंझिगच्या महापौरांनी डॅनिएल यांच्या अटकेसाठी वॉरंट काढले. त्यांना आता पुन्हा अटक झाली असती तर मोठी शिक्षा झाली असती. तसेच पुन्हा त्यांना सक्तीने व्यापार प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले असते. अटक टाळण्यासाठी ते सारखे शहरे बदलत राहिले. एकाच जागेवर फार काळ राहिले असते तर त्यांना निश्चितच अटक झाली असती, त्यामुळे ते वेगवेगळ्या देशांतील वेगवेगळ्या शहरांत भटकत राहिले. सुरुवातीला पोलिसांना चकवणे हाच त्यांचा हेतू होता. पोलिसांना चकवण्यासाठी डेन्मार्क, जर्मनी, हॉलंड, स्वीडन, पोलंड अशा अनेक देशांमध्ये ते गेले. त्यातील मोठा काळ त्यांनी इंग्लंडमध्ये घालवला. थोडेसे सरावल्यानंतर त्यांनी विज्ञान संशोधन सुरू असणाऱ्या ठिकाणांना आणि व्यक्तींना भेटी देण्यास सुरुवात केली. त्यावेळी ओलेस रोमर यांनी वेगळा तापमापी बनवल्याचे त्यांना समजले, तेव्हा ते त्यांना भेटण्यास गेले. ओलेस एक वेगळेच रसायन होते. त्यांनी प्रकाशाचा वेग मोजण्याच्या प्रयोगासह अनेक प्रयोग केले होते. त्याचसोबत ते कोपनहेगन पोलिसांचे प्रमुख होते. सावज आयतेच पोलिसांच्या जाळ्यात आले होते. मात्र, त्यांच्यातील वैज्ञानिक ओढ ओलेस यांनी ओळखली आणि त्यांनी स्वतः होऊन यामध्ये लक्ष घालायचे नाही असे ठरवले.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

मात्र, जेव्हा डॅनिएल पोलीस प्रमुखांच्या घरीच रहात आहेत आणि ते त्यांच्यावर काहीच कार्यवाही करत नाहीत हे महापौरांच्या लक्षात आले, तेव्हा त्यांनी स्वतः होऊन डॅनिएल यांच्या अटकेचा आदेश रद्द केला. भटकंतीचा सुरुवातीचा थोडा काळ सोडला तर डॅनिएल सातत्याने शिकत होते. त्यातून एक वैज्ञानिक साकारला जात होता, अटक आदेश रद्द झाल्यानंतर ते स्थिरावले आणि त्यांनी फ्लोरेंटाईन तापमापीवर आपले लक्ष केंद्रित केले. त्यांच्या असे लक्षात आले की, कोणतेही दोन फ्लोरेंटाईन तापमापी एकसमान तापमान दाखवत नाहीत. मात्र, साठेएक वर्षांपूर्वी उपलब्ध असणाऱ्या ज्ञानानुसारचा सर्वोत्कृष्ट तापमापी होता. फ्लोरन्स शहरातील वर्षातील सर्वात कमी तापमान, किमान तापमान मानले जात असे, तसेच सर्वाधिक तापमानास कमाल तापमान मानत; त्यामुळे वेगवेगळ्या वर्षी बनवलेले तापमापी अर्थातच वेगवेगळे तापमान दाखवत, त्यामुळे तापमापी बनवण्याचे हे तंत्र चुकीचे आणि अवैज्ञानिक असल्याचे डॅनिएल यांचे मत झाले. त्यांच्या मते एखाद्या तंत्राने कितीही तापमापी बनवले तरी त्यांनी एखाद्या ठिकाणी एकच तापमान दाखवायला हवे. यापूर्वी आयझॅक न्यूटनने वैश्विक स्तरावर मान्य असणाऱ्या भौतिक स्थितीचे तापमान कमाल आणि किमान तापमान म्हणून घेण्याची संकल्पना मांडली होती, मात्र तसे त्यांनी कोणतेही प्रयोग केले नव्हते. यातून फॅरनहाईट यांच्या लक्षात आले की, सर्व द्रव पदार्थ एका विशिष्ट तापमानाला वितळतात आणि दुसऱ्या विशिष्ट तापमानाला उकळतात. त्याला कमी किंवा जास्त उष्णता दिली तरी यात फरक पडत नाही. हे आपले निरीक्षण एका शोधनिबंधातून 'फिलॉसॉफिकल मॅगेझीन'मध्ये प्रसिद्ध केले.

पुढे या प्रकल्पावर ते सात वर्षे संशोधन करत राहिले. तापमापीसाठी काचनलिका महत्त्वाची असते. ते तंत्रज्ञानही फॅरनहाईट यांनी शिकून घेतले. त्यांना आसरा देणाऱ्या ओलेस यांच्या संकल्पनेनुसार त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी पाण्याचा वितलनांक ७.५ डिग्री धरला तर उत्कलनांक ६० डिग्री धरला; तर मानवी शरीराचे तापमान २२.५ डिग्री धरला. त्यांनी पाणी, अल्कोहोल आणि पारा असे विविध पदार्थ वापरून तापमापी बनवले. त्यांनी केलेले सर्वच प्रयत्न, कथा आणि दंतकथा हे अफलातून आणि मनोरंजक आहेत, ते आवर्जून वाचायला हवेत. मात्र, त्यांनी न्यूटन यांच्या संकल्पनांना मूर्त रूप दिले; स्थल, काल निरपेक्ष तापमानी बनवला आणि ज्ञान-विज्ञानासाठी प्रसंगी फरारी होऊन विज्ञानाच्या इतिहासात अमर झाले.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००